पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रवेश सूचना सन २०२१–२०२२

Estd. 1962
"A++" *Accrediated by NAAC(2021) with CGPA 3.52*

**एम.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एल.एल.एम. एम.पी.ए. नाटयशास्त्र व सर्टिफिकेट, डिप्लोमा, पीजी डिप्लोमा अभ्यासक्रम मुदतवाढबाबत.....**

सन २०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठ अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयांत शिकविल्या जाणा–या एम.एस्सी. अभ्यासक्रम व ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे अशा अभ्यासक्रमांसाठी तसेच विद्यापीठ अधिविभागात शिकवल्या जाणा–या एम.ए., एम.कॉम., एल.एल.एम. एम.पी.ए नाटयशास्त्र व सर्टिफिकेट, डिप्लोमा,पीजी डिप्लोमा अभ्यासक्रम व दूर शिक्षण केंद्राकडील एम.ए. फॅकल्टी चेंज व एम.बी.ए. डिस्टन्स मोड या अभ्यासक्रमांकरीता ऑनलाईन प्रवेश अर्ज **दि.०५/०८/२०२१** पर्यंत भरण्याबाबत मुदत देण्यात आली होती.

परंतू राज्यात सुरू असलेल्या कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे, तसेच काही ठिकाणी पूरस्थिती असल्याने ब–याच विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता आलेले नाही, त्यामुळे उपरोक्त सर्व अभ्यासक्रमांसाठी अर्ज भरण्याची **मुदत दि.२५/०८/२०२१ पर्यंत वाढविण्यात आली आहे**. तरी याची नोंद संबधित विद्यार्थ्यांनी घेवून ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अद्याप अर्ज भरणा केलेले नाहीत त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणा करावेत. या अनुषंगाने सविस्तर तपशिल शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळ **www.unishivaji.ac.in/admission 2021-22** या लिंकवर उपलब्ध आहे. आधिक माहितीसाठी pgadmission@unishivaji.ac.in या ईमेलवर मेल करण्यात यावा.

दि.०५/०८/२०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज केलेल्या व ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे, त्या अभ्यासक्रमांसाठी परीक्षा केंद्र **दि.१३/०८/२०२१ ते दि.२३/०८/२०२१ पर्यंत** विद्यार्थ्यांनी निवडावयाची आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्र नोंदविण्यासाठी **www.unishivaji.ac.in/admission 2021-22** या लिंकवर त्यांचा अॅप्लीकेशन क्रमांक टाकून परीक्षा केंद्र अंतिम करावे.

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : १२/०८/२०२१

**प्रा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए., एम.कॉम., एल.एल.एम., एम.पी.ए., या पदवीत्तर, नाट्यशास्त्र व सर्टिफिकेट डिप्लोमा, पीजी डिप्लोमा या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची मुदत २५ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यायचा असेल त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या बेवसाईटवर आपले नाव नोंद करावे, असे आवाहन कुलसचिव प्रा. डॉ. व्ही.डी. नांदवडेकर यांनी केले आहे.